■ RNI NO. MAHMAR/25/A3029

■ लातूर

■ वर्ष : ७ वे, अंक नं. : ४६

■ दि. ०७ जून २०२६, वार : रविवार

■ पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# चाळीस वर्षा पासून चा छोट्या व्यावसाय धारकांच्या व्यावसायाचा प्रश्न मार्गी

## केज न.प.चे गटनेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड यांच्या पाठपुराव्याला यश

## जिरायत खात्याची जागा अखेर केज नगरपंचायतीच्या ताब्यात, व्यावसाय धारकात नवचैतन्य निर्माण झाले असून आनंदोत्सव व्यक्त केला जात आहे

**केज/प्रतिनिधी :** केज शहरातील मागील चार ते साडेचार वर्षा पासून सार्वजनिक विकासकामांना गती मिळत असतांना एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटना प्रत्यक्षात अनेक दिवसांच्या प्रयत्ना नंतर गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला केज येथील छोट्या व्यावसाय धारकांच्या व्यावसायाच्या जागेचा प्रश्न मिटला आहे अशी माहिती पत्रकार परिषदेमध्ये गटनेते हारुणभाई इनामदार यांनी दिली आहे.





जिरायत खात्याची शासकीय जागा अधिकृतपणे केज नगरपंचायत प्रशासनाच्या ताब्यात देण्यात आली आहे. जागेचे ताबा पत्र महसूल प्रशासनाने अधिकृतपणे केज नगरपंचायत ला हस्तांतरित केले आहे. नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने मंगळवार, दिनांक ४ जून २०२६ रोजी ही हस्तांतरण प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे पूर्ण करण्यात आली.असून राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा गटनेते हारुणभाई इनामदार व केज नगर पंचायत च्या नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड यांच्या

पाठपुराव्यामुळे आणि सर्व राजकीय वरीष्ठांच्या सहकार्याने केज नगरपंचायतीला यश प्राप्त झाले आहे अशी प्रतिक्रिया नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व गटनेते हारूणभाई इनामदार यांनी सदर जागेचा ताबा घेते वेळी माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया दिली आहे.

यासाठी गटनेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सिताताई बनसोड यांनी सर्व वरिष्ठांना आणि नगरसेवकांना विश्वासात घेऊन सातत्याने शासन व प्रशासन स्तरावर पाठपुरावा केला, त्यांच्या या पाठपुराला यश येऊन गोरगरीब छोट्या व्यवसायिकांना आधार मिळाला आहे.

केज शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या या जागेचा वापर जन हितासाठी व्हावा, यासाठी या दोन्ही नेत्यांनी सर्व कायदेशीर आणि प्रशासकीय बाबींची पूर्तता करून या महत्त्वपूर्ण कामात केजच्या विकासासाठी स्व.लोकनेते विलासरावजी देशमुख,माजी खासदार रजनीताई पाटील, स्व.विमलताई मुंदडा, आणि विद्यमान खासदार बजरंग बप्पा सोनवणे, विद्यमान आमदार नमिताताई मुंदडा, ज्येष्ठ नेते रमेशरावजी आडसकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अंकुशराव इंगळे यांचे व अप्रत्यक्ष नेतेमंडळी चे मोलाचे सहकार्य लाभले. त्याचबरोबर केज नगरपंचायत चे मुख्यधिकारी, नगरसेवक व सर्व कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सर्वांच्या विशेष प्रयत्नांमुळे हस्तांतरणाचे आदेश तातडीने निघण्यास मोठी मदत झाली आहे अशा प्रतिक्रिया प्रसार माध्यमांशी बोलताना इनामदार व बनसोड यांनी दिल्या आहेत.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी आणि शासकीय जागा हस्तांतरणाच्या प्रक्रियेसाठी राज्याचे दिवंगत नेतृत्व ना. अजितदादा पवार यांचे अत्यंत मोलाचे सहकार्य व खंबीर मार्गदर्शन लाभले. तसेच जिल्हा अधिकारी साहेब व उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे यांनी शासकीय पातळीवरील अनेक तांत्रिक व प्रशासकीय अडचणी दूर करण्यासाठी विशेष लक्ष देऊन मोलाचे सहकार्य केले.

या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल केज नगरपंचायतीच्या वतीने ना. स्व. अजितदादा पवार आणि जिल्हाधिकारी साहेब व उपजिल्हाधिकारी वजाळे साहेब यांचे जाहीर आभार तमाम केज वासियांच्या वतीने व केज नगरपंचायत च्या वतीने गटनेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी मानले आहे. ही जागा केज नगरपंचायतीला हस्तांतरित होण्याच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये दिवंगत तहसीलदार राकेश गिड्डे साहेब यांचे योगदान अत्यंत मोलाचे राहिले आहे.

त्यांनी आपल्या कार्यकाळात या प्रकरणातील सर्व कायदेशीर अडचणी दूर करून प्रशासकीय प्रक्रियेला गती दिली होती, ज्याची आज या प्रसंगी कृतज्ञतेने आठवण काढण्यात आली.

कागदपत्रांची अचूक पडताळणी आणि ताबा पावती तयार करण्यापासून ते प्रत्यक्ष हस्तांतरणापर्यंत अहोरात्र कष्ट घेऊन अतिशय मोलाचे सहकार्य केले. या दोन्ही महसूल अधिकाऱ्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे हा महत्वाचा प्रश्न मार्गी लागला असून शहराच्या विकासाला नवी दिशा मिळणार असून रस्त्याच्या कडेवर बसुन हातावर पोट भरणाऱ्या व्यावसायीकांचा जिव्हाळ्या चा मोठा प्रश्न मिटणार आहे. मागील चाळीस वर्षापासून जी फरफट व्यावसाय धारकांची चालू होती ती आता मिटणार असून केजच्या विकासात एक महत्त्वाचा टप्पा जनविकास आघाडीच्या काळात पूर्ण होत असल्या चा आनंद होत असून या कामी आजी, माजी, सर्व राजकीय नेत्यांचे तसेच अधिकाऱ्यांचे आभार इनामदार व बनसोड यांच्याकडून मानण्यात आले. या कामी सर्व यंत्रणा अगदी पारदर्शक पणे राबवून छोट्या व्यावसाय धारकांच्या रोजीरोटीचा प्रश्न तात्पुरता मिटणार आहे यामुळे केज शहरवासियांतून तसेच व्यावसाय धारक आणि नागरिकांमधून आनंद व्यक्त केला जात आहे.

जनविकास आघाडी चे सर्वेसर्वा मा.हारुणभाई इनामदार, नगराध्यक्ष सौ. सिताताई बनसोड यांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि ना. अजितदादा पवार, खासदार बजरंग बप्पा सोनवणे व मा. खा. रजनीताई पाटील यांच्या पाठबळामुळे, तसेच उपजिल्हाधिकारी वजाळे साहेब, दिवंगत तहसीलदार राकेश गिड्डे साहेब व तलाठी साहिल इनामदार यांच्या प्रशासकीय सहकार्यामुळे केज नगरपंचायतीला हक्काची जागा मिळाली आहे. या जागेवर आता सार्वजनिक प्रकल्प, छोट्या व्यावसायधारकांसाठी तात्पुरते प्रश्न मिटणार आहेत तसेच प्रशासकीय इमारत तसेच नागरिकांसाठी उपयुक्त सुविधा उभारण्याचा मार्ग मोकळा झाला असून, व्यावसाय धारकांनी तसेच केजवासीयांनी जेष्ठ सामाजिक नेते मा. हारुणभाई इनामदार, नगरपंचायत च्या विद्यमान नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड

आणि सर्व नेत्यांचे वसेच महसूल प्रशासनाचे जाहीर आभार मानले आहेत. या पत्रकार परिषदेला ज्येष्ठ नेते हारूणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड, जनविकास परिवर्तन आघाडीचे गटनेते राजूभाई इनामदार, नगरसेवक जलालभाई इनामदार, लखन हजारे, व्यापारी प्रतिनिधी महेश जाजू यांच्यासह पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# परिवहन विभागावर खोटे लाचखोरीचे आरोप; चालकाविरुद्ध लातूर ग्रामीण पोलिसांत गुन्हा

**लातूर/प्रतिनिधी :** परराज्यातील खासगी प्रवासी बसवर केलेल्या दंडात्मक कारवाईनंतर परिवहन विभागाच्या पथकाने लाच मागितल्याचा आरोप सोशल मीडियासह काही वृत्त माध्यमांमधून प्रसारित करण्यात आला होता. मात्र हा आरोप पूर्णपणे खोटा, दिशाभूल करणारा आणि तथ्यहीन असल्याचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे. या प्रकरणात विभागाची बदनामी करून चुकीची माहिती प्रसारित केल्याप्रकरणी संबंधित वाहन चालकाविरुद्ध लातूर (ग्रामीण) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, ४ जून २०२६ रोजी सकाळी ८.३९ वाजता परिवहन विभागाच्या पथकाने परराज्यातील नोंदणी क्रमांक एआर–२०–डी–३७८६ असलेल्या खासगी प्रवासी बसची तपासणी केली. तपासणीदरम्यान संबंधित वाहनाकडे महाराष्ट्र राज्याचा वैध परवाना () नसल्याचे तसेच आवश्यक कर () भरलेला नसल्याचे आढळून आले. त्यामुळे मोटार वाहन कायद्यानुसार नियमानुसार ३५ हजार ९६० रुपयांचा दंड आकारण्यात आला. लाच मागितल्याचा आरोप पूर्णपणे निराधार तपासणीदरम्यान परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी किंवा कर्मचाऱ्यांनी कोणत्याही प्रकारची लाच मागितलेली नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. आकारण्यात आलेल्या दंडाची संपूर्ण रक्कम वाहनधारकाने शासनाच्या खात्यात ऑनलाइन पद्धतीने जमा केली असून त्याचे अधिकृत पुरावे विभागाकडे उपलब्ध आहेत. यापूर्वीही झाली होती कारवाई संबंधित वाहनावर यापूर्वीही विविध उल्लंघनांमुळे दंडात्मक कारवाई करण्यात आली होती. त्यामध्ये :
७ एप्रिल २०२६ : ₹३,६५०
१३ मे २०२६ : ₹३,०००
१९ मे २०२६ : ₹३५,९६०
हे सर्व दंड वाहनधारकाने नियमानुसार ऑनलाइन पद्धतीने भरल्याची नोंद विभागाकडे असल्याचे सांगण्यात आले. अफवांपासून सावध राहण्याचे आवाहन परिवहन विभागाची प्रतिमा मलीन करण्याच्या उद्देशाने खोटी माहिती पसरविण्यात आल्याचा आरोप प्रशासनाने केला आहे. याप्रकरणी संबंधित चालकाविरुद्ध लातूर (ग्रामीण) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. नागरिकांनी सोशल मीडियावरील अप्रमाणित माहितीवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीचीच खातरजमा करावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने केले आहे.

# माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी नागरिकांच्या घेतल्या भेटी



**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शनिवार दि. ६ जुन रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी नागरिक यांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समस्या समजून घेऊन त्यांच्या निमंत्रनाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.

यावेळी माजी आमदार वैजनाथ शिंदे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंखे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर शिवाजी जवळगेकर, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास को ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन किरण जाधव, व्हाईस चेअरमन समद पटेल, यशवंतराव पाटील, विजयकुमार साबदे, एस.आर पाटील, सय्यद मोइनउल्ला, विकास कांबळे, विकास देशमुख, व्यंकटराव गर्जे, व्यंकटेश पुरी, गोविंद देशमुख, सचिन मस्के, अल्लाबक्ष शेख, सुनील बसपुरे, राजकुमार कत्ते, गणेश एस.आर देशमुख, विष्णुदास धायगुडे, सुरेश चव्हाण, एकनाथ पाटील, शेषेराव नंदगावे, छाया मस्के, उत्तम जाधव, मिनीनाथ मगर, संजय राठोड, लिंबा जाधव, सुनील राठोड हुसेनबी शेख, भगवान डोंगरे आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

## आरबीआयचा कॅनरा बँकेला दणका, रिझर्व्ह बँकेनं ४१.८० लाखांचा दंड ठोठावला

नवी दिल्ली : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं कॅनरा बँकेला ४१.८० लाख रुपयांचा दंड केला आहे. आरबीआयनं यासंदर्भात ५ जूनला आदेश जारी केला आहे. या संदर्भात प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आलं आहे. कॅनरा बँकेककडून केवायसी आणि बँकेतील अनक्लेम्ड डिपॉजिटस आणि इनऑपरेटिव्ह अकाऊंटससंदर्भातील मार्गदर्शक सूचनांची पूर्तता न केल्यानं ४१.८० लाख रुपयांचा दंड करण्यात आला आहे. आरबीआयनं त्यांना बँकिंग नियमन कायदा १९४९ नुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करत सेक्शन ४७ अ(१)(म) आणि सेक्शन्स (४६)(४)(ग) या नियमांचा आधार घेत कॅनरा बँकेवर कारवाई केली आहे. आरबीआयकडून कॅनरा बँकेच्या ३१ मार्च २०२५ च्या आर्थिक स्थितीचं वैधानिक तपासणी करत पर्यवेक्षण करण्यात आलं होतं. त्यावेळी कॅनरा बँकेकडून काही नियम ांची पूर्तता केली गेली नसल्याचं समोर आल्यानं आरबीआयनं नोटीस दिलं होतं.





## संपादकीय...

### राष्ट्रभक्तीची मक्तेदारी कोणाची?

जंतर-मंतरवर हातात संविधान घेऊन आलेल्या आणि ''जयभीम''चा नारा देणाऱ्या नागरिकांना काही जण देशद्रोही, राष्ट्रविरोधी किंवा दहशतवादी म्हणून हिणवतात. हा केवळ राजकीय वादाचा विषय नाही, तर भारतीय लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांशी संबंधित गंभीर प्रश्न आहे. एखाद्या व्यक्तीची राष्ट्रभक्ती घोषणांवरून ठरवायची की त्याच्या संविधाननिष्ठ वर्तनावरून, याचा विचार समाजाने करणे आवश्यक आहे. भारतीय संविधान हे देशाचे सर्वोच्च विधिमंडळाने स्वीकारलेले मूलभूत दस्तऐवज आहे. संविधान हातात घेणे म्हणजे देशाच्या कायद्याचा, लोकशाहीचा आणि न्यायव्यवस्थेचा सन्मान करणे होय. मग संविधानाचा आधार घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला संशयाच्या नजरेने का पाहिले जाते, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. ''जयभीम'' ही घोषणा केवळ एका व्यक्तीची स्तुती नसून सामाजिक न्याय, समानता आणि बंधुतेच्या विचारांची अभिव्यक्ती आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या निर्मितीत दिलेले योगदान देश मान्य करतो. त्यांच्या विचारांचा जयघोष करणे हे आपोआप राष्ट्रविरोधी कसे ठरू शकते? लोकशाही व्यवस्थेत आंदोलन करणे, सरकारच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणे आणि आपल्या मागण्या मांडणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. जंतर-मंतरसारखी ठिकाणे याच लोकशाही परंपरेचे प्रतीक आहेत. त्यामुळे आंदोलन करणाऱ्यांना सरसकट देशद्रोही ठरवणे लोकशाहीच्या भावनेलाच धक्का देणारे ठरते. देशद्रोह हा अत्यंत गंभीर आरोप आहे. तो केवळ वैचारिक मतभेदांमुळे लावला जाऊ शकत नाही. न्यायालयांनीही अनेक वेळा स्पष्ट केले आहे की सरकारविरोधी मत व्यक्त करणे आणि राष्ट्रविरोधी कृत्य करणे या दोन पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत. आजच्या काळात सोशल मीडियामुळे कोणत्याही व्यक्तीला किंवा समूहाला काही क्षणांत राष्ट्रविरोधी ठरवले जाते. पुरावे, न्यायप्रक्रिया आणि तथ्य यांना दुय्यम स्थान दिले जाते. ही प्रवृत्ती लोकशाहीसाठी धोकादायक आहे. जर संविधान हातात घेणारे लोक देशद्रोही असतील, तर संविधानाची शपथ घेणारे लोकप्रतिनिधी कोण आहेत? हा प्रश्न स्वाभाविकपणे निर्माण होतो. कारण देशाच्या प्रत्येक महत्त्वाच्या संस्थेचा आधार संविधानच आहे. राष्ट्रभक्तीची व्याख्या केवळ विशिष्ट घोषणा, विशिष्ट विचारसरणी किंवा विशिष्ट राजकीय पक्षाशी जोडली जाऊ शकत नाही. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात राष्ट्रभक्ती अनेक स्वरूपांत व्यक्त होते. सीमेवर लढणारा सैनिक राष्ट्रभक्त असतोच; पण शेतात अन्न पिकवणारा शेतकरी, विद्यार्थ्यांना घडवणारा शिक्षक, जीव वाचवणारा डॉक्टर आणि संविधानिक हक्कांसाठी लढणारा नागरिकही राष्ट्रनिर्मितीचाच भाग असतो. एखाद्या आंदोलनात काही व्यक्तींची भूमिका चुकीची असू शकते. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई होणे आवश्यकही आहे. परंतु काही व्यक्तींच्या कृतीमुळे संपूर्ण समूहाला देशद्रोही ठरवणे न्याय्य ठरत नाही. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास पाहिला तर तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी अनेक स्वातंत्र्यसैनिकांनाही देशद्रोही ठरवले होते. काळाच्या ओघात तेच लोक राष्ट्रनायक म्हणून ओळखले गेले. त्यामुळे विरोधकांना देशद्रोही म्हणण्याची घाई धोकादायक ठरू शकते. देशभक्तीचा खरा कस संकटकाळात लागतो. पूर, दुष्काळ, महामारी किंवा सामाजिक संघर्षाच्या काळात जो समाजाच्या पाठीशी उभा राहतो, तोच खरा राष्ट्रभक्त ठरतो. घोषणांपेक्षा कृती अधिक महत्त्वाची असते. भारतीय संविधानातील ''स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय'' ही मूल्ये जपणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. या मूल्यांचे रक्षण करणारी भूमिका राष्ट्रहिताचीच मानली पाहिजे. आज समाजात वैचारिक ध्रुवीकरण वाढत आहे. मतभेद असले की विरोधकाला देशद्रोही ठरवण्याची भाषा वापरली जाते. अशा वातावरणात संवाद आणि सहिष्णुता अधिक महत्त्वाची ठरते. राष्ट्रभक्तीचे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार कोणत्याही व्यक्ती, संघटना किंवा राजकीय पक्षाला नाही. हा अधिकार संविधानाने कोणालाही दिलेला नाही. राष्ट्रभक्ती ही कृतीतून सिद्ध होते, घोषणांमधून नव्हे. देशावर प्रेम करणे म्हणजे केवळ सरकारचे समर्थन करणे नव्हे. सरकारच्या चुकीच्या धोरणांवर टीका करणे, अन्यायाविरोधात आवाज उठवणे आणि नागरिकांच्या हक्कांसाठी लढणे हेही लोकशाहीतील राष्ट्रप्रेमाचेच रूप आहे. मतभेदांना देशद्रोह आणि समर्थनाला राष्ट्रभक्ती अशी सोपी विभागणी लोकशाहीला कमकुवत करते. कारण लोकशाहीचे सौंदर्य विविध मतांमध्ये आणि मुक्त चर्चेत आहे. आज गरज आहे ती भावनिक आरोप-प्रत्यारोपांपेक्षा विवेकाधारित चर्चेची. नागरिकांचे विचार, भूमिका आणि आंदोलन यांचे मूल्यमापन तथ्यांच्या आधारावर झाले पाहिजे. संविधान हातात घेणारा प्रत्येकजण राष्ट्रभक्त असेलच असे नाही, पण तो देशद्रोहीही ठरत नाही. त्याचप्रमाणे राष्ट्रभक्तीचा दावा करणारा प्रत्येकजण देशहितासाठीच काम करतो असेही नाही. अंतिम कसोटी एकच आहेसंविधान, कायदा आणि देशाच्या लोकशाही मूल्यांप्रती असलेली निष्ठा. भारतात राष्ट्रभक्तीची खरी ओळख एखाद्या घोषणेत नाही, तर विविधतेचा सन्मान करणाऱ्या, संविधानावर विश्वास ठेवणाऱ्या आणि देशाला अधिक न्याय्य, समतावादी व मजबूत बनवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या नागरिकांमध्ये आहे. हाच भारतीय लोकशाहीचा आत्मा आहे.

# भदंत महास्थविर चंद्रमणी : विस्मृतीत गेलेल्या एका दीपस्तंभाची स्मृती

६ जून हा दिवस भारतीय बौद्ध इतिहासात केवळ एका भिक्खूचा जन्मदिन नाही तर तो भारतीय सामाजिक पुनर्जागरणाच्या एका शांत, संयमी पण दूरगामी क्रांतीचा स्मृतिदिन आहे. ६ जून १८७३ रोजी ब्रह्मदेशातील आराकान प्रांतात जन्मलेले भदंत महास्थविर चंद्रमणी हे नाव उच्चारले की नागपूरच्या धम्मदीक्षेचे, कुशीनगरच्या पुनरुज्जीवनाचे आणि भारतातील बौद्ध धर्माच्या नव्या पर्वाचे एक विलक्षण पान डोळ्यांसमोर उभे राहते. ८ मे १९७२ रोजी त्यांनी देह ठेवला पण त्यांनी प्रज्वलित केलेली धम्मज्योत आजही अनेकांच्या विचारांना दिशा देत आहे. इतिहासाची एक मोठी विडंबना अशी असते की, जे लोक शांतपणे युगनिर्मिती करतात, त्यांची नावे अनेकदा जनस्मृतीच्या काठावरच राहतात. भदंत चंद्रमणी यांच्याबाबतही असेच झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक धम्मदीक्षेचा प्रसंग आपण अत्यंत अभिमानाने सांगतो पण त्या ऐतिहासिक क्षणी दीक्षादान करणारे महास्थविर चंद्रमणी कोण होते, त्यांच्या आयुष्याचा संघर्ष काय होता, भारतासाठी त्यांनी कोणती तपश्चर्या केली, हे अनेकांना ठाऊक नसते. म्हणूनच त्यांची स्मृती ही केवळ श्रद्धेची बाब नाही तर ती इतिहासाशी प्रामाणिक राहण्याची जबाबदारी आहे.



ब्रह्मदेश हा बौद्ध संस्कृतीने नटलेला प्रदेश. तेथील जनमानस भारताकडे पवित्र भूमी म्हणून पाहत आले. कारण हीच ती भूमी जिथे भगवान बुद्धांनी ज्ञानप्राप्ती केली, धम्मचक्र प्रवर्तन केले आणि करुणा, प्रज्ञा व समतेचा संदेश जगभर पोहोचविला. अशा भूमीत जन्मलेल्या चंद्रमणींच्या मनात भारताबद्दल ओढ असणे स्वाभाविकच होते. अवघ्या सोळाव्या वर्षी १८८९ मध्ये ते भारतातील बौद्ध तीर्थक्षेत्रांच्या दर्शनासाठी आले. हा प्रवास त्यांच्या आयुष्यातील केवळ धार्मिक यात्रा नव्हती तर ती त्यांच्या आयुष्याचा निर्णायक वळण ठरली. भारतभूमीत पाऊल ठेवताना त्यांच्या मनात एक भव्य कल्पना असणार बुद्धाची भूमी, धम्माची भूमी, समतेच्या विचारांची भूमी. परंतु जे दृश्य त्यांनी पाहिले ते त्यांच्या अंत:करणाला खोलवर भिडले. ज्या देशाने जगाला बौद्ध धर्म दिला, त्या देशातच बौद्ध धर्माचे अनुयायी नगण्य! बुद्धाची स्मारके भग्नावस्थेत, तीर्थक्षेत्रे उपेक्षित, आणि बुद्धाचा समतामूलक संदेश समाजाच्या काठावर फेकलेला. हा धक्का त्यांच्या आयुष्याला नवीन अर्थ देऊन गेला. त्यांनी परत ब्रह्मदेशी न जाण्याचा निर्णय घेतला. १८८९ पासून त्यांनी भारतालाच आपली कर्मभूमी मानले.

ही निवड साधी नव्हती. एका तरुणाने आपल्या जन्मभूमीचा, कुटुंबाचा, परिचित संस्कृतीचा त्याग करून एका अशा देशात राहण्याचा निर्णय घेतला, जिथे त्याला ना सत्तेचा आधार होता, ना संपत्तीचा. त्याच्याकडे होते ते केवळ धम्मावरील निष्ठा आणि भारताबद्दलची करुणा. आजच्या काळात हा निर्णय समजून घेणेही कठीण आहे. कारण आज अनेकदा धर्म हा केवळ विधी, प्रतीक आणि ओळखीचा विषय बनतो, पण चंद्रमणींसाठी धर्म म्हणजे लोककल्याणाची अखंड साधना होती. भगवान बुद्धांचे महापरिनिर्वाण ज्या पवित्र भूमीत झाले, त्या कुशीनगरला त्यांनी आपल्या कार्याचे केंद्र बनविले. त्या काळात कुशीनगर हे जागतिक बौद्ध नकाशावरचे तेजस्वी केंद्र नव्हते. ते उपेक्षित, दुर्लक्षित आणि इतिहासाच्या धुळीत हरवलेले होते. भदंत चंद्रमणींनी तेथे केवळ वास्तव्य केले नाही, तर त्या भूमीला नवजीवन दिले. बुद्धजयंती उत्सव, बौद्ध संमेलने, धम्मपरिषदांची परंपरा त्यांनी रुजविली. त्यातून कुशीनगर पुन्हा एकदा जागतिक बौद्ध चेतनेचे केंद्र बनू लागले.

एका व्यक्तीची दृष्टी किती दूरवर परिणाम करू शकते, याचे हे जिवंत उदाहरण आहे. कारण त्यांनी फक्त धार्मिक कार्यक्रम घडविले नाहीत, तर त्यांनी धम्माला सामाजिक शक्ती बनविण्याचा प्रयत्न केला. धर्म जिवंत राहतो तो केवळ मंदिरांमुळे नाही, तर विचारांच्या परंपरेमुळे. म्हणूनच त्यांनी शिक्षणाला केंद्रस्थानी ठेवले. शेकडो तरुण-तरुणींना त्यांनी बौद्ध वाङ्मयाचा अभ्यास करण्यासाठी प्रेरित केले. काहींना सिलोन, जपान, ब्रह्मदेश अशा बौद्ध देशांत उच्च शिक्षणासाठी पाठविले. त्या काळात हे कार्य किती मोठे आणि दूरदृष्टीचे होते, याची कल्पना आज सहज होत नाही. कारण तेव्हा परदेशात शिक्षण पाठविणे ही केवळ आर्थिकच नव्हे तर संघटनात्मकदृष्ट्याही कठीण बाब होती. पण चंद्रमणींना माहीत होते की विचारांची परंपरा टिकवायची असेल, तर विद्वानांची पिढी तयार करावी लागते. याच प्रयत्नांतून दोन तेजस्वी नावे पुढे आली, आनंद कौसल्यायन आणि राहुल सांकृत्यायन. या दोघांनी भारतीय बौद्ध बौद्धिक परंपरेला नवे क्षितिज दिले. विशेषतः राहुल सांकृत्यायन यांनी तिबेटमध्ये जाऊन बौद्ध धर्माची हजारो हस्तलिखिते शोधून भारतात आणली. ज्ञानाची ती संपदा भारताच्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनासाठी अनमोल ठरली. या महान कार्यामागे चंद्रमणींची प्रेरणा होती, हे विसरता येणार नाही.

आज आपण ज्ञान, संशोधन, संस्कृती आणि वारसा याबद्दल मोठ्या चर्चा करतो; पण भदंत चंद्रमणींनी शंभर वर्षांपूर्वी हे सारे प्रत्यक्ष कृतीत उतरविले होते. त्यांची दृष्टी केवळ अध्यात्मिक नव्हती; ती बौद्धिक, सांस्कृतिक आणि सामाजिक होती. कुशीनगरमध्ये त्यांनी धर्मशाळा उभारल्या, दवाखाने सुरू केले, स्तूप बांधले, गरीब मुलांसाठी शाळा काढल्या. ही कामे सांगताना त्यांची खरी ओळख उलगडते. कारण ते फक्त धर्मोपदेशक नव्हते तर ते समाजकारणाच्या मूळ प्रश्नांना भिडणारे धम्मसेवक होते. भूक, अशिक्षा, आजार, दारिद्र्य या साऱ्या मानवी वेदनांपासून धर्म वेगळा असू शकत नाही, हीच बुद्धाची शिकवण त्यांनी प्रत्यक्ष जगली. त्यांनी उभारलेल्या इमारतींची किंमत चाळीस वर्षांपूर्वी सात लाख रुपये होती, असे म्हटले जाते. परंतु त्या वास्तूंची खरी किंमत रुपयांत मोजता येणार नाही. कारण त्या केवळ विटा आणि दगड नव्हत्या, त्या भारतीय बौद्ध पुनर्जागरणाच्या पायाभरणीच्या साक्षी होत्या.

चंद्रमणी हे विद्वान लेखकही होते. ब्रह्मी आणि हिंदी भाषेत त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. धम्मपद, मंगलसूक्त, भगवान बुद्धाचे चरित्र, बुद्धाचे उपदेश यांसारख्या ग्रंथांमधून त्यांनी बौद्ध धर्माची गूढता नव्हे, तर त्याची जीवनस्पर्शी बाजू सामान्य माणसापर्यंत पोहोचविली. ज्ञान लोकांपर्यंत नेण्याची ही लोकाभिमुख वृत्तीच त्यांना विलक्षण मोठे बनवते आणि मग येतो भारतीय इतिहासातील तो थरारक क्षण १४ ऑक्टोबर १९५६, नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्मातील जातिभेद, अपमान आणि अमानुषतेविरुद्ध अंतिम बंड पुकारत बौद्ध धर्म स्वीकारला. हा प्रसंग केवळ धार्मिक परिवर्तन नव्हता तर तो भारतीय सामाजिक क्रांतीचा महामोर्चा होता. या महान ऐतिहासिक क्षणी बाबासाहेबांनी दीक्षा देण्यासाठी ज्यांची निवड केली, ते होते महास्थविर चंद्रमणी. ही निवड योगायोग नव्हती. बाबासाहेबांना अशा व्यक्तीची गरज होती ज्याच्या हातात परंपरेची शुचिता, विद्वत्तेची खोली आणि करुणेची उब असेल. चंद्रमणी त्या सर्व गुणांचे मूर्तिमंत प्रतीक होते.

अंशी वर्षांचा हा वृद्ध भिक्खू नागपूरला आला आणि लाखो लोकांच्या उपस्थितीत त्याने बाबासाहेबांना व त्यांच्या अनुयायांना त्रिशरण-पंचशील दिले. त्या क्षणी केवळ धर्मदीक्षा झाली नाही, भारतीय इतिहासाने नवीन दिशा घेतली. शतकानुशतके तुडविलेल्या, अपमानित केलेल्या जनसमुदायाला नव्या मानवी अस्मितेचा, समतेचा आणि स्वाभिमानाचा मार्ग मिळाला. आज धम्मदीक्षेच्या इतिहासात बाबासाहेबांचे नाव तेजस्वीपणे उजळते, तसेच उजळले पाहिजे. पण त्या तेजस्वी क्षणामागे उभा असलेला शांत दीपस्तंभ म्हणजे भदंत चंद्रमणी, ही जाणीव तितकीच आवश्यक आहे. आजच्या भारतात त्यांच्या स्मृतीचे महत्त्व आणखी वाढते. कारण आपण पुन्हा एकदा विषमता, द्वेष, सामाजिक ताण आणि ऐतिहासिक विस्मरणाच्या काळातून जात आहोत. अशावेळी चंद्रमणींचे जीवन आपल्याला सांगते की समाजबदलाचा पाया घोषणांत नसतो; तो निष्ठेत, ज्ञानात, शिक्षणात आणि माणसांवरील करुणेत असतो. त्यांनी सत्ता मागितली नाही, प्रसिद्धी शोधली नाही, स्वत:साठी कोणताही पंथ उभारला नाही. त्यांनी फक्त एक काम केले, बुद्धाचा विचार भारतात पुन्हा रुजविण्याची आयुष्यभर तपश्चर्या. आजचा समाज जर खऱ्या अर्थाने त्यांच्या स्मृतीला अभिवादन करू इच्छित असेल, तर ते केवळ माल्यार्पणाने होणार नाही. ते होईल समतेचा विचार जगवून, शिक्षणाला सामाजिक मुक्तीचे साधन मानून आणि इतिहासातील अशा मूक महापुरुषांना योग्य स्थान देऊन.

६ जूनला आपण त्यांचा जन्मदिन स्मरतो. पण ही स्मृती केवळ कॅलेंडरपुरती राहू नये. ती मनात प्रश्न निर्माण करणारी असावी. आपण बुद्धाच्या भूमीत बुद्धाचा संदेश कितपत जगतो आहोत? आपण समतेच्या मूल्यांशी किती प्रामाणिक आहोत? आणि आपण आपल्या इतिहासातील अशा दीपस्तंभांना किती जपतो आहोत? भदंत महास्थविर चंद्रमणी यांचे आयुष्य म्हणजे एका माणसाने शांतपणे केलेल्या महान कार्याची प्रेरणादायी गाथा आहे. त्यांनी भारताला काही मागितले नाही, उलट भारताला त्याचा विसरलेला आत्मा परत मिळवून देण्यासाठी संपूर्ण आयुष्य वाहिले. इतिहासातील काही व्यक्ती अशा असतात की त्यांची उंची घोषणांनी नव्हे, तर काळाने सिद्ध केलेली असते. चंद्रमणी हे त्यापैकीच एक. म्हणूनच आज त्यांच्या स्मृतिदिनी एवढेच म्हणावेसे वाटते, धम्मदीक्षेच्या त्या ऐतिहासिक क्षणामागे उभा असलेला हा ऋषितुल्य भिक्खू भारतीय समाजाच्या कृतज्ञ स्मरणात अधिक उजळला पाहिजे. कारण काही नावे केवळ इतिहासाची नोंद नसतात तर ती राष्ट्राच्या नैतिक स्मृतीची ओळख असतात. भदंत महास्थविर चंद्रमणी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या करुणा, प्रज्ञा, समता आणि मानवमुक्तीच्या धम्मविचारांना विनम्र अभिवादन. त्यांनी प्रज्वलित केलेली धम्मज्योत आपल्या समाजाला अधिक न्याय्य, समतामूलक आणि विवेकनिष्ठ भविष्याकडे नेणारी प्रेरणा ठरो, हीच कृतज्ञ शुभेच्छा.

---------------



**प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

# प्रबोधनातून समाज परिवर्तन

खरं पाहिले तर भारतीय समाजात खूप लोक प्रबोधन करणारे आहेत.त्यात गाणे गाणारे असतील, या कथा वाचक असतील, या सुगम संगीत वाले असेल,या कव्वा ली गाणारे असेल या नाटककार असेल,या कवी असतील या भाषण देणारे सामाजिक,राजकीय, धार्मिक कार्यकर्ते असतील. या अन्य कोणी असतील.आप आपल्या पद्धतीने ही सारी लोक समाजाचे प्रबोधन करीत असतात. ज्याचे कडे जेवढी बुद्धी मत्ता असेल,जी, जी ज्या,ज्या विचार धारेची लोक असतील ती,ती विचार धारा लोकांपर्यंत प्रबोधनाच्या माध्यमातून पोहचविण्याचा प्रयत्न करतात. ऐकणारे लाखो,करोडो लोक आहेत.ज्या लोकांची शैली ही लोकांना आकृष्ट करून, त्याच्या हृदया पर्यंत शब्द पोहचविणारी असते लोक तिकडे झुकताना आपल्याला जाणवते.

भारतीय न्याय संहिता मध्ये हिंसेला प्रतिबंध करण्यात आलेला आहे.अनाचाराला प्रतिबंध करण्यात आलेला आहे.छेड छाड ला अटकाव करण्यात आलेली आहे. फसवणूक करणाऱ्याला प्रतिबंध करण्यात आलेला आहे. त्याच बरोबर नशा पाणी घेऊन धुमाकूळ करणाऱ्या साठी प्रतिबंध करण्यात आलेला आहे. म्हणजे हे सर्व पूर्वीच्या भारतीय दंड संहिता म्हणजे (आय पी सी) मध्ये होते. अलीकडे त्याला भारतीय न्याय संहिता (बी एन एस) मध्ये दिल्या गेलेले आहे. हे अनेकांना माहित आहे.जर प्रबोधनकरानी,आणि प्रशासन,शासनातील लोकांनी या संदर्भात लोकांना योग्य प्रबोधन केले तर देशात होत असलेला कल्लोळ सहज कमी होईल.म्हणजे च प्रबोधनातून समाज परिवर्तन होईल.खरं तर समाज सुखी व्हावा,चांगला घडावा हेच प्रशासन,शासनाचे आदय कर्तव्य आहे.आणि सामाजिक कार्यकर्त्यांची जबाबदारी आहे. आपण ती जबाबदारी कोणत्या अंगाने खांद्यावर घेतो, आणि लोकांचे प्रबोधन करतो त्यावर लोकांचे हित,अहित अवलंबून आहे.

जर लोकांनी खऱ्या अर्थाने भारतीय समाजाचे हित लक्षात घेता वाटचाल केली तर देश हा प्रगतीच्या दिशेने जाईल आणि सर्व भारतीय बांधव सुखी होईल. ही जबाबदारी आपण आपले मूलभूत कर्तव्य म्हणून पार पाडली पाहिजे. म्हणजेच ''प्रबोधनातून समाज परिवर्तन'' होय.ते आपल्या हातून व्हावे असेच भारतीय नागरिकांना वाटते.'' अनेक लोक भाषणे देतात, कोणी काल्पनिक गोष्टी सांगून त्याना अंधश्रद्धेकडे घेऊन जाते,तर काही वैज्ञानिक दृष्टीकोण सांगून ते कसे कल्पोकल्पीत लोकांना सांगून फसवितात हे सांगितल्या जाते. या प्रबोधन करणाऱ्याच्या मधात ऐकणारा आणि त्या मार्गाने जाणारा मोठा वर्ग आहे तो अशिक्षितही आहे तर काही शिकलेला देखील आहे. खरं तर शिकलेल्या माणसाला वैज्ञानिक दृष्टीकोण समजला पाहिजे पण काहीना पूर्वी पासूनच कानावर काल्पनिक कथा ऐकायला येत असल्यामुळे त्याच्यात बदल होण्यासाठी खूप कालावधी लागतो.जसा मुलगा,मुलगी जन्म झाल्यानंतर त्याला अठरा वर्षानंतर मतदानाचा अधिकार संविधानाने दिला आहे,म्हणजे त्याला स्वतः चे मत कुठे दिले पाहिजे याची जाणीव होते असे म्हणायला हरकत नाही त्याच शिक्षण देखील काही प्रमाणात झालेले असते त्यामुळे तो योग्य अयोग्य निर्णय घेण्यासाठी सक्षम असतो. असे असतांना देखील अशोक खरात सारखे भोंदू बाबा हे शिकलेल्या माणसाला आपल्या जाड्यात अडकवितात याला काय म्हणता येईल?

भारतात अंधश्रद्धा निर्मूलन चा कायदा आहे असे असतांना देखील हा अशोक खरात आपले जाळे पसरवितो याला नेमके कारण काय असेल हा संशोधनाचा आणि चर्चे चा विषय झाला आहे.अलीकडे तो अठरा मार्च पासून जेल मध्ये, वेगवेगळ्या गुन्ह्यात लटकलेला आपल्याला दिसतो.लोकांची फसवणूक करणे हे काहींना सहज जमते,पण तो लोकांची फसवणूक करत आहे हे सांगणे आणि लोकांच्या डोक्यात प्रबोधन करून टाकणे जरा कठीण असते, कारण प्रबोधन करण्यासाठी त्याला उपलब्ध स्टेज हवा असतो. ज्ञान आहे, त्याला सांगताही येते, लोकही कार्यक्रमासाठी येतील पण त्याचे नियोजन करणे,स्टेज उपलब्ध करून देणे, प्रचार, प्रसार करण्यासाठी पैशाची जुळवा, जुळव करणे, वेळ प्रसंगी भोंदू बाबाच्या कार्यकर्त्यासोबत संघर्ष करणे,प्रशासनाला समजावून सांगणे,हे सारे करत असतांना खूप तारेवरची कसरत करावी लागते म्हणजे वेळ,पैसा,श्रम हे सारे त्याला दयावे लागते आणि ते एकट्याचे काम नसल्याने खूप त्रास होतो आणि बऱ्याचदा त्यावर कुटुंबातील लोकांची जबाबदारी असल्यामुळे लोक फारसे पुढे येतांना दिसत नाही त्यामुळे भोंदूगिरी चा बाबा लोकांचा व्यवसाय चालतो ही वास्तविकता आहे. म्हणजे फारसे लोक सार्वजनिक कामा कडे दुर्लक्ष करतात. तसा अंधश्रद्धा निर्मूलनाचा कायदा असल्यामुळे भारतीय समाजाचे प्रबोधन होण्याच्या दृष्टीने प्रशासन आणि शासनाने त्यावर काम करण्याची गरज आहे. तसे पाहिले तर संविधानात मूलभूत कर्तव्या मध्ये आर्टिकल ५१ मध्ये वैज्ञानिक दृष्टीकोण जोपासला पाहिजे असे सांगितले आहे.त्यामुळे शासन आणि प्रशासन यांची जबाबदारी जास्त आहे. पण ते मोठया प्रमाणात प्रबोधन करीत नाही काही वैज्ञानिक दृष्टीकोणावर बोलतात यात दुमत नाही पण ते मोठया प्रमाणात व्हायला हवे तरच लोक अंधश्रद्धा मधून बाहेर येतील अन्यथा नाही.

**अविनाश टिपले चंद्रपूर ९९७०९१७३८९**

# नाभिक संघटनेने जाहीर केली नवी दरवाढ

**छत्रपती संभाजीनगर :** वाढत्या महागाईमुळे विविध क्षेत्रांमध्ये दरवाढ होत असताना आता नाभिक सेवाही महागल्या आहेत. राज्यातील नाभिक संघटनांनी ६ जूनपासून दाढी, कटिंग तसंच इतर सलून सेवांच्या दरात २० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ही माहिती नाभिक महामंडळाचे राज्याध्यक्ष सयाजी झुंजार यांनी दिली.

महागाईमुळे सलून व्यवसायाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला असल्याचं त्यांनी सांगितलं. बँकांच्या वाढलेल्या व्याजदरांचा तसंच इंधन दरवाढीमुळे वाढलेल्या वाहतूक खर्चाचाही व्यवसायावर परिणाम होत आहे. याशिवाय शॅम्पू, हेअर कलर, ब्लीच, फेशियल क्रीम, जेल, वॅक्स, विविध डिस्पोजेबल वस्तू, टॉवेल धुण्यासाठी लागणारं साहित्य, निर्जंतुकीकरणासाठी वापरण्यात येणारे पदार्थ आदी वस्तूंच्या किमती वाढल्या आहेत. सलून व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या बहुतांश वस्तू पेट्रो-केमिकल उद्योगाशी संबंधित असल्यानं त्यांच्या दरवाढीचा थेट परिणाम व्यवसायावर होत आहे. वाढत्या खर्चाचा भार लक्षात घेऊन नाभिक संघटनांनी दरवाढीचा निर्णय घेतल्याचं सयाजी झुंजार यांनी स्पष्ट केलं.

शनिवारपासून नवीन दर लागू : वाढत्या महागाईचा परिणाम सर्वसामान्यांच्या जीवनमानासह विविध व्यवसायांवरही होत आहे. इंधन दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढला असून त्याचा परिणाम सर्वच वस्तूंच्या किमतींवर झाला आहे. सलून व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे व्यावसायिकांवरील आर्थिक भार वाढल्यानं दरवाढीचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती प्रदेश उपाध्यक्ष विष्णू वखरे यांनी दिली. नव्या दरांची अंमलबजावणी शनिवारपासून करण्यात येणार आहे.

लोकांना अधिक आकर्षक आणि नीटनेटकं दिसण्यासाठी सेवा देणारा नाभिक कारागीर आज आर्थिक अडचणीत सापडला असल्याचं मत प्रदेश कोषाध्यक्ष रामदास पवार यांनी व्यक्त केलं. सकाळपासून रात्रीपर्यंत उभं राहून काम करणारा सलून व्यावसायिक कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचं शिक्षण, घरभाडं, वीजबिल, दुकानभाडं, कर, कर्जाचे हप्ते आणि इतर जबाबदाऱ्या पार पाडत असतो. मात्र वाढत्या महागाईमुळे या सर्व खर्चात मोठी वाढ झाली आहे. ग्रामीण भागात परिस्थिती अधिक गंभीर असून अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह केवळ सलून व्यवसायावर अवलंबून आहे.

## नाशिकचा आणखी एक भामटा ज्योतिषी समोर, 'ज्योतिषा'चे थेट दुबई कनेक्शन ?

**नाशिक :** नाशिक पोलिसांच्या रडारवर सध्या एक नाव चर्चेत आहे ते म्हणजे सचिन देशमुख! स्वत:ला ज्योतिषी म्हणवणारा, हनुमान भक्त असल्याचा दावा करणारा हा व्यक्ती आता एका मोठ्या आर्थिक घोटाळ्यामुळे पोलिसांना हवा आहे. कारण, श्रद्धा आणि भविष्याच्या नावाखाली त्याने शेकडो लोकांना कोट्यवधींचा गंडा घातल्याचा आरोप आहे. नाशिकमधील शरणपूर रोड परिसरात 'अंजनीय ज्योतिष' नावाने कार्यालय चालवणाऱ्या सचिन देशमुखने लोकांचा विश्वास जिंकला. भविष्य सांगण्याच्या माध्यम ातून त्याने अनेकांना शेअर मार्केटमध्ये मोठ्या परताव्याचं आमिष दाखवलं. विश्वास इतका बसला की तब्बल ३२१ जणांनी कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक त्याच्या माध्यमातून केली. ही रक्कम काही लाखांत नव्हती तर ती थेट ३६ कोटी ३२ लाख रुपये होती. मात्र धक्कादायक बाब म्हणजे, ही रक्कम शेअर मार्केटमध्ये गुंतवलीच गेली नाही. उलट हा पैसा हडप करण्यात आल्याचं सायबर पोलिसांच्या तपासात समोर आलं आहे. या प्रकरणाचा पहिला संशय एका किराणा दुकानदाराला आला. देशमुखने त्यालाही शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडत तब्बल ७३ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. संशय आल्यावर दुकानदाराने सायबर पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि त्यानंतर या संपूर्ण घोटाळ्याचा पर्दाफाश झाला.

धक्कादायक म्हणजे, तक्रारींचा आकडा वाढतच गेला. आतापर्यंत ३२९ जणांच्या तक्रारी पोलिसांकडे दाखल झाल्या असून, फसवणुकीची व्याप्ती दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. दरम्यान, पैसे घेऊन सचिन देशमुख फरार झाला असून तो दुबईत लपल्याचा पोलिसांना संशय आहे. त्याच्या विरोधात लूकआऊट नोटीस जारी करण्यात आली असून सायबर पोलीस त्याच्या मागावर आहेत.

श्रद्धा, ज्योतिष आणि मोठ्या नफ्याचं आमिष या तिन्ही गोष्टींचा वापर करून लोकांना जाळ्यात ओढल्याचा आरोप असलेल्या या प्रकरणामुळे नाशिकमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

# फाईलींच्या पलीकडचं प्रशासन

## जेव्हा ठाणे जिल्हाधिकारी घोंगडीवर बसून लोकांचे अश्रू पुसतात...

**के. रवि (दादा)**

**ठाणे :** शासकीय कार्यालय म्हटलं की, डोळ्यांसमोर येतात त्या फाईलींचे ढीग, टेबल-खुर्च्या, साहेबांची केबिन आणि दारात उभी असलेली सामान्य माणसांची गर्दी. पण विचार करा, जर हेच कार्यालय थेट तुमच्या गावात, तुमच्या अंगणात आलं तर? आणि साक्षात जिल्ह्याचे प्रशासकीय सर्वोच्च प्रमुख म्हणजेच जिल्हाधिकारी साहेब जर तुमच्यासोबत जमिनीवर, एका साध्या घोंगडीवर बसून तुमचे प्रश्न ऐकून घेऊन सोडवू लागले तर? होय, हा कोण्या चित्रपटामधला प्रसंग नाही, तर महाराष्ट्रातील प्रसिद्ध ठाणे जिल्हा महसूल प्रशासनाने शहापूर तालुक्यातील दुर्गम भागात घडवून आणलेली एक मूक क्रांती आहे.

ठाण्याचे धडाडीचे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या संकल्पनेतून आणि अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, भिवंडी प्रांताधिकारी अमित सानप, शहापूरचे तहसिलदार परमेश्वर कासुळे यांच्या पुढाकारातून शहापूरच्या आदिवासी आणि ग्रामीण भागात आयोजित करण्यात आलेली ही घोंगडी बैठक आज संपूर्ण महाराष्ट्रात कौतुकाचा आणि चर्चेचा विषय ठरली आहे.

या ऐतिहासिक प्रसंगाची पार्श्वभूमी अत्यंत उत्कंठावर्धक होती. दिवसभराच्या शेतीच्या कामानंतर थकलेला शेतकरी आणि गावकरी रात्रीच्या वेळी एका ठिकाणी जमले होते. एरवी रात्रीच्या वेळी शासकीय अधिकारी दुर्गम भागात फिरकत नाहीत, असा एक सर्वसामान्य समज असतो. मात्र, या उपक्रमाचे सर्वात मोठे





वैशिष्ट्य हेच होते की, ही बैठक रात्रीच्या वेळी थेट गावातच आयोजित करण्यात आली होती. जिल्हाधिकारी . श्रीकृष्ण पांचाळ महोदयांचे गावात आगमन होताच पारंपारिक ढोल-ताशांच्या गजरात आणि नृत्याने ग्रामस्थांनी त्यांचे अत्यंत उत्साहात व आपुलकीने स्वागत केले. गावकरी आणि प्रशासकीय अधिकारी यांच्यातील हे दृश्य मानवी नात्याची एक नवी वीण घट्ट करणारी होते. कोणताही बडेजाव नाही, व्ही.आय.पी. संस्कृतीचा लवलेषही नाही, अशा अत्यंत साध्या,पारंपारिक वातावरणात या घोंगडी बैठकीची सुरुवात झाली. एका बाजूला जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ हे स्वतः जमिनीवर सर्वसामान्य लोकांसोबत घोंगडीवर बसले होते.रात्रीच्या अंधारात एका साध्या बल्बच्या उजेडात सुरू असलेला हा थेट संवाद म्हणजे केवळ एक शासकीय औपचारिकता नव्हती, तर प्रशासन आणि जनतेमधील तुटत चाललेल्या विश्वासाला , गोड संवाददाता जोडणारा एक भक्कम सेतू होता. या बैठकीला शहापूर तालुक्यातील ग्रामस्थांचा उदंड आणि उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. वर्षानुवर्षे मनात साचलेले प्रश्न घेऊन आशेने डोळे लावून बसलेले नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने या ठिकाणी हजर होत्या.

बैठकीत ग्रामस्थांनी पिण्याच्या पाण्याचा बिकट प्रश्न, दळणवळणासाठी खराब झालेले रस्ते, वीजपुरवठा, वनहक्क दाव्यांमधील अडचणी, शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळणे आणि जमीनविषयक गुंतागुंतीचे प्रश्न अशा स्थानिक विकासकामांबाबतच्या अनेक समस्या थेट मांडल्या. संवेदनशील जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक विषयाची स्वतः सविस्तर नोंद घेतली आणि फाईलींच्या चौकटीबाहेर पडून कामाला गती दिली. कार्यालयात वातानुकूलित केबिनमध्ये बसून फाईली पाहिल्या जातात, निर्णय घेतले जातात; पण गावात येऊन लोकांचे चेहरे, त्यांच्या डोळ्यांतील अपेक्षा आणि त्यांचे वास्तविक प्रश्न समजून घेणं जास्त महत्त्वाचं असतं, म्हणूनच अशा घोंगडी बैठकी लोकशाहीला अधिक बळकट करतात, असा दृढ विश्वास जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी यावेळी व्यक्त केला.

गावात जाऊन घोंगडीवर बसून झालेला हा थेट संवाद अधिकारी आणि जनता यांच्यातील अंतर कमी करतो, परस्पर विश्वास वाढवतो आणि अपेक्षा, कृती तसेच समन्वयातून विकासाचा मार्ग अधिक सुकर करतो, हेच या बैठकीने दाखवून दिले. हा केवळ एका व्यक्तीचा उपक्रम नव्हता, तर ठाणे जिल्हा प्रशासनाच्या सामूहिक संवेदनशीलतेचे आणि उत्कृष्ट संयुक्त काम हे उत्तम उदाहरण होते.

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या या लोककल्याणकारी मोहिमेला गती देण्यासाठी ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, भिवंडीचे उपविभागीय अधिकारी अमित सानप आणि स्थानिक तहसिलदार परमेश्वर कासुळे यांच्यासह संपूर्ण महसूल यंत्रणेतील महत्त्वाचे अधिकारी आणि विविध विभागांचे प्रतिनिधी या घोंगडीवर लोक समस्या सोडवण्यासाठी रात्री उशिरापर्यंत ठाण मांडून बसले होते. अधिकाऱ्यांनी केवळ लोकांच्या तक्रारी ऐकल्या नाहीत, तर शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती थेट तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवली आणि ''प्रशासन तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे,'' हा विश्वास प्रत्येक ग्रामस्थाच्या मनात निर्माण केला.

लोकशाहीचा चौथा स्तंभ समजला जाणाऱ्या प्रसारमाध्यमांनीदेखील या उपक्रमाचे अत्यंत सकारात्मक आणि प्रेरणादायी स्वागत केले आहे. फाईलींमधील कोरड्या अक्षरांपेक्षा माणसांच्या चेहऱ्यावरचे भाव वाचणं हेच खऱ्या संवेदनशील प्रशासनाचं लक्षण आहे, अशा शब्दांत प्रसारमाध्यमांनी या घोंगडी बैठकीचे कौतुक केले असून हा लोकाभिमुख प्रशासनाचा एक आदर्श वस्तुपाठ ठरत असल्याचे म्हटले आहे. आजवर आम्ही साहेबांना भेटायला शहरात जायचो, तासनतास लायनीत थांबायचो, पण आज साहेब स्वतः आमच्या ग्रामस्थांनी घोंगडीवर येऊन बसले आणि आमचं सुख-दुःख त्यांनी आपलं मानलं, अशी भावुक प्रतिक्रिया एका ज्येष्ठ ग्रामस्थाने दिली.

शहापूर तालुक्यातील हा उपक्रम केवळ एका रात्रीपुरता मर्यादित नसून, तो राज्याच्या संपूर्ण प्रशासकीय व्यवस्थेला एक नवी सकारात्मक दिशा दाखवणारा प्रकाशस्तंभ ठरला आहे. विशेष म्हणजे या घोंगडी बैठकीनंतर ''डोळखांब'' या गावात स्वतः जिल्हाधिकाऱ्यांसह सर्व अधिकारी मुक्कामास होते. विकास प्रक्रियेत अंतिम घटकाचा सहभाग वाढवण्यासाठी असे उपक्रम मैलाचा दगड ठरतील यात शंका नाही. माणसांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणाऱ्या या घोंगडी बैठकीला आणि ठाणे जिल्हा महसूल प्रशासनाच्या या कौतुकास्पद पुढाकाराला मनापासून शुभेच्छा, प्रशासनाचा हाच ठाणे घोंगडी बैठक पॅटर्न उद्याच्या समृद्ध महाराष्ट्राची ओळख बनो, हीच सदिच्छा मनोज सुमन शिवाजी सानप जिल्हा माहिती अधिकारी ठाणे यांनी व्यक्त केली .

## स्वानंद सार्वजनिक वाचनालयात शिवराज्याभिषेकदिन सोहळा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी संपन्न

**केज/प्रतिनिधी :** स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे दिनांक ६ जून २०२ ६ रोजी शिवराज्याभिषेक सोहळा ग्रंथप्रदर्शन, व्याख्यान, रंगभरण स्पर्धा, वक्तृतव स्पर्धा, निबंध स्पर्धा इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रम घेवून जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिध्द वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य, डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.



सकाळी ९ ते ५ पर्यंत ग्रंथप्रदर्शन घेण्यात आले. याचदरम्यान सकाळी ९ ते १० या वेळात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत प्रथम - गौरी ज्ञानेश्वर गायकवाड, द्वितीय शिवानी भगत यांनी प्राविण्य मिळविले. १० ते ११ या वेळात सेवानिवृत्त मुख्याध्यापक छगन नाना गायकवाड यांचे व्याख्यान संपन्न झाले. त्यानंतर ११ ते १२ या वेळात रंगभरण स्पर्धा घेण्यात अली. या स्पर्धेत प्रथम - विक्रम गायकवाड, द्वितीय - शिवानी भगत यांनी प्राविण्य मिळविले. त्यानंतर निबंध स्पर्धा घेण्यात आली. यात प्रथम - गौरी गायकवाड, द्वितीय - आनंद गायकवाड यांनी प्रविण्य मिळविले.परिक्षक म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक छगननाना गायकवाड यांनी काम पाहिले. विजयी स्पर्धकांना प्राचार्य डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड, परिक्षक छगननाना गायकवाड,ए. बी. गायकवाड, बाळसाहेब गायकवाड यांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून सन्मानीत करण्यात आले.

शेवटी अध्यक्षीय समारोप डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला. आपल्या अध्यक्षीय समारोपात शिव राज्याभिषेक सोहळा या विषयी सविस्तर विवेचन करून शिवरायांच्या जनकल्याण विषयक कार्याची महती सांगीतली.

तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे शेतीविषयक धोरण, पर्यावरण विषयक धोरण, महिलाविषयक धोरण, परराष्ट्र धोरण, गड - किल्लेविषयक धोरण, संरक्षण विषयक धोरण, जलसंवर्धन विषयक धोरण, दळणवळण विषयक धोरण, राज्यकारभार विषयक धोरण, शकविषयक धोरण, रयतेच्या कल्याणाचे धोरण, आर्थिक धोरण, राजनैविक धोरण, जमीन सुधारणा विषयक धोरण, शेतसारा - शेतमोजणी विषयक धोरण, परराष्ट्र धोरण, आरमार विषयक धोरण, कायदे विषयक धोरण अशाप्रकारची अनेक धोरणे आखून रयतेच्या हिताचे निर्णय व धोरणे राजांनी आखली व पूर्णत्वास नेहली.

राजाभिषेकाच्या निमित्ताने अष्टप्रधान मंडळ नेमून लोकशाही ची संकल्पना प्रत्यक्षात साकारली. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे कल्याण हेच उदिष्ट्य हळ्यासमोर बवून राज्यकारभार केला असे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.

## मराठा विद्यार्थ्यांना ओबीसींसारख्या शिष्यवृत्ती व सवलती; मनोज जरांगे पाटील यांनी मानले सरकारचे आभार!

**मुंबई :** मराठा समाजाच्या शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने मराठा विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीय (ओबीसी) विद्यार्थ्यांप्रमाणे शैक्षणिक सवलती आणि कल्याणकारी योजनांचा लाभ देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयामुळे राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना उच्च व व्यावसायिक शिक्षणासाठी आर्थिक आधार मिळणार आहे.

मराठा विद्यार्थ्यांना दिलासा - या निर्णयानुसार ओबीसी विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या आठ महत्त्वाच्या शैक्षणिक योजनांचा लाभ आता म राठा समाजातील विद्यार्थ्यांनाही मि ळणार आहे. विशेषत: व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा निर्णय दिलासादायक मानला जात आहे.



मनोज जरांगे पाटील यांनी मानले सरकारचे आभार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने मराठा समाजाच्या गोरगरिबांसाठी ज्या काही योजना लागू केल्या त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो, अशी प्रतिक्रिया मनोज जरांगे पाटील यांनी दिली. मराठा आरक्षणासह विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन पुकारलं होतं. या आंदोलनाला यश मिळताना दिसत आहे. ''सरकारने ओबीसींप्रमाणे मराठा समाजालाही ८ सवलती लागू केल्यात. मात्र, आता या योजना बंद होऊ देऊ नका. असंच मराठा समाजाच्या कल्याणाचं काम करा. समाज तुम्हाला डोक्यावर घेईल,'' असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

### रेल्वे स्थानकावर अचानक भीषण स्फोटाचा आवाज! लुधियाना स्टेशनवर खळबळ

लुधियाना : पंजाबमधील लुधियाना रेल्वे स्थानक शुक्रवारी (५ जून) सकाळी झालेल्या एका रहस्यमय स्फोटामुळे हादरून गेले. सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास स्थानकातील वॉशरूम परिसरात जोरदार स्फोट झाल्याने काही काळ प्रवाशांमध्ये भीती आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. स्फोटाचा आवाज इतका मोठा होता की संपूर्ण स्टेशन परिसर दणाणून गेला.घटनेच्या वेळी स्थानकावर कटरा स्पेशल ट्रेन उभी होती. तसेच मोठ्या संख्येने प्रवासी रेल्वेची प्रतीक्षा करत होते. अचानक झालेल्या स्फोटामुळे अनेक प्रवासी घाबरून सुरक्षित ठिकाणी धावू लागले. काही क्षणांसाठी स्टेशन परिसरात अफवा आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, स्फोट झालेल्या ठिकाणाजवळ काही प्रवासी उपस्थित होते. मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. प्राथमिक माहितीनुसार या घटनेत कोणीही गंभीर जखमी झाल्याचे वृत्त नाही. तरीही स्फोटाच्या स्वरूपामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण कायम आहे.

### धक्कादायक! ५ महिन्यांपासून बेपत्ता गँगस्टरचा अखेर उलगडा; ड्रेनेज चेंबरमधून सापडला मानवी सांगाडा

नालासोपारा : गेल्या ५ महिन्यांपासून बेपत्ता असलेल्या कुख्यात गँगस्टर रवि बिडलान प्रकरणात म ोठा खुलासा झाला आहे. नालासोपारा पूर्व परिसरातील वैतिवाडी येथे ड्रेनेज चेंबरमधून मानवी सांगाडा जप्त करण्यात आला असून, तो रवि बिडलान याचाच असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी पोलिसांनी एकाला अटक केली असून आणखी ४ जणांना ताब्यात घेतले आहे. रवि बिडलान (वय ३४) हा जानेवारी महिन्यापासून बेपत्ता होता. त्याच्या कुटुंबीयांनी २६ जानेवारी रोजी आचोळे पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली होती. संबंधित व्यक्तींनी रविचा खून करून मृतदेह नाल्यात टाकल्याचे बोलले जात असल्याचे समजताच त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली.

या माहितीच्या आधारे आचोळे पोलिसांनी आणि अग्निशमन दलाने संयुक्त कारवाई केली. वैतिवाडी परिसरातील ड्रेनेज चेंबरमध्ये शोधमोहीम राबवण्यात आली. यावेळी तेथून मानवी सांगाडा आणि काही फाटलेले कपडे सापडले. घटनास्थळी आढळलेल्या कपड्यांची ओळख रवि बिडलान यांच्या पत्नीने केली.

या प्रकरणात सुमित सालासार उर्फ 'बा' याला अटक करण्यात आली आहे. तसेच रोहन जगदाळे उर्फ 'टायगर' याच्यासह इतर ४ संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी हत्या आणि पुरावे नष्ट करण्यासह विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

## फिल्म स्टार अभिनेते गायक राजेंद्र अशोक केदार यांचा पुण्यात मा. पुणे जिल्हा न्या. नामदेव चव्हाण सर यांच्या हस्ते सन्मान

**स्नेहा उत्तम मडावी/पुणे :** फिल्म स्टार अभिनेते-गायक राजेंद्र अशोक केदार यांनी समाजसेवक आणि कलाकार म्हणून आपल्या आयुष्यात खूप मेहनत घेतली आणि आपल्या आई-वडिलांना गौरव मिळवून दिला. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी समर्पित केले आणि अनेक पुरस्कार मिळवले. गरीब मुलांसाठी अनाथाश्रम सुरू करण्याचे त्यांचे स्वप्न आहे. राजेंद्र अशोक केदार यांनी अनेक चित्रपटांमध्ये काम केले असून, त्यात त्यांनी प्रामुख्याने विनोदी भूमिका साकारल्या आहेत आणि गाणीही गायली आहेत. आज त्यांना चित्रपट स्टार म्हणून ओळखले जाते. त्यांचे चाहते राजेंद्र केदार म्हणाले की, त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये लहान-मोठ्या भूमिका साकारल्या आहेत.मराठी सीरियल = मोराबा, आप सुनेंगे मेरे गीत गत, शुभ विवाह, मुलगी झाली हो, रामा राघव, सुंदरी, सुंदर आसे आमचे घर, श्री स्वामी समर्थ, तुझ्या इश्काचा नाद खुला, अंबेडकर सीरियल, गाथा नवनाथंची, बापमानुस, आई आणि बाबा रिटायर होत आहे। हिंदी मालिका सावधान इंडिया, शाबाश इंडिया.मराठी चित्रपट = आल्टून पलटुन, आता माझी हटली, मराठी पौल पढ़ते पुधे, मि शिवाजी मराठे, एक दाव रंगला, डिलीवरी बॉय। हिंदी फिल्म = गांधीगिरी, शशांक, द केज ऑफ लाइफ, आगामी फिल्म सेफर। मराठी वेबसीरीज = पेट पुराण, वर वराचे स्वयंवर। यूट्यूब शॉर्ट फिल्म: भूत. असे अनेक काम. केले .या कार्यक्रमात राजेंद्र यांनी खूप चांगला प्रतिसाद दिला जुनी गाणी गायली, जुन्या आठवणींना उजाळा दिला.पुणे जिल्ह्याचे माननीय न्यायमूर्ती नामदेव चव्हाण साहेब यांनी गाण्यांची प्रशंसा केली आणि त्यांना शुभेच्छा दिल्या. आणि या कार्यक्रमाचे आयोजक दुष्यंत राजे जगताप होते आणी डॉ लेखक दत्ताजी कोहिनकर होते. नगरसेवक पल्लवी जावळे, गणेश कल्याणकर, कल्पना बहिरट, ऐश्वर्या थोरात, धनंजय जाधव, राजेंद्र काकडे, गोपाळ तिवारी, दत्तात्रय पासलकर, प्रशांत गांधी, सुरेश जैन, विजयकुमार मार्लेचा, आविनाश गोगावले स्वाती पवार-शिंदे, राजेश कोंढरे, विलास कुडले, संतोष अमित जावळकर, रूपे, किरण मते, पत्रकार स्नेहा उत्तम मडावी आले न्यू इंग्लिश स्कुल टिळक रोड नवी पेठ सिथ गणेश हॉल मध्ये आयोजित केलेया कार्यक्रमाला अभिनेते राजेंद्र अशोक केदार उपस्थित होते. सन्मान मा. जिल्हा न्यायधीश नामदेव चव्हाण साहेब यांच्या हाताने राजेंद्र अशोक केदार यांचा सत्कार करण्यात आला केदार साहेबांचा गाण्याचे आवाज ऐकून माणूस परिवार महाराष्ट्र राज्य प्रणित आदर्श कार्यकर्ता गौरव सेवा समितीचे अध्यक्ष दुष्यंत राजे जगताप यांनी केदार सरांचा सत्कार केला. माझी न्यायमूर्ती नामदेव चव्हाण सर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला व पत्रकार व प्रसारमाध्यमे उपस्थित होते.



# औसा येथील शेळी चोरीचा गुन्हा एलसीबीची कारवाई उघडकीस; दोन आरोपी जेरबंद, २ लाख १९ हजारांचा मुद्देमाल हस्तगत



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात मालमत्तेविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेकडून सातत्याने विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केलेल्या कारवाईत औसा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या शेळी चोरीच्या गुन्ह्याचा छडा लावत दोन आरोपींना अटक करून चोरीस गेलेल्या तीन शेळ्या तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेला ऑटो असा एकूण २ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

औसा पोलीस ठाणे गु.र.नं. २९६/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता अन्वये दाखल असलेल्या शेळी चोरीच्या गुन्ह्याचा तपास सुरू असताना दिनांक ०५ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने साई नाका ते डी-मार्ट रोडवरील सापळा रचून रात्री सुमारे ११.२० वाजण्याच्या सुमारास संशयित ऑटो थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये तीन जिवंत शेळ्या आढळून आल्या. चौकशीदरम्यान संबंधितांनी त्या शेळ्या आलमला रोड परिसरातील पत्र्याच्या शेडमधून चोरी केल्याची कबुली दिली.

या कारवाईत आरोपी

१) रुपेश संतोष बनसोडे (वय २८ वर्षे, रा. भाडगाव, ता. जि. लातूर)

२) गजानन राम जाधव (वय ३२ वर्षे, रा. खाडगाव रोड, लातूर)

यांना ताब्यात घेण्यात आले.आरोपींकडून चोरीस गेलेल्या तीन जिवंत शेळ्या, तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेला बजाज कंपनीचा ऑटो रिक्षा (क्र. एमएच-२४ एटी-५३३४) एकूण २ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक लातूर श्री अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील उपनिरीक्षक राजेश घाडगे, पोलीस उपनिरीक्षक अमर केंद्रे, पोलीस अमलदार रियाज सौदागर, साहेबराव हाके, अर्जुनसिंग राजपूत, विनोद चलवाड, मनोज खोसे, आनंद हल्लाळे, प्रविण कोळसुरे, संतोष खांडेकर यांच्या पथकाने पार पाडली.

दोन्ही आरोपींना पुढील तपास व कायदेशीर कारवाईसाठी मुद्देमालासह औसा पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

## मामाच्या बागेतले आंबे खायला गेला अन्... विचित्र दुर्घटनेत ३ वर्षाच्या चिमुकल्याने गमावला प्राण

**नाशिक** : मामाच्या गावी सुट्टीनिमित्त आलेल्या अवघ्या तीन वर्षीय चिमुकल्याचा पाण्याच्या टाकीत पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना देवळा तालुक्यातील दहिवड धोबीघाट येथे घडली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे कृष्णा महेश अहिरे (वय ३ वर्षे, रा. वायगाव, ता. बागलाण) हा उन्हाळी सुट्टीनिमित्त आपल्या मामाच्या गावी दहिवड धोबीघाट येथे आला होता. घराजवळील आंब्याच्या झाडाखाली बसून तो आंबे खात होता. आंबे खाल्ल्यानंतर हात खराब झाल्याने तो जवळच असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ हात धुण्यासाठी गेला. यावेळी त्याचा तोल जाऊन तो पाण्याच्या टाकीत पडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

दरम्यान, कृष्णाचे मामा जीवन देवरे व आजोबा बापू देवरे हे पाण्याच्या टाकीजवळ आले असता त्यांना कृष्णा पाण्यात पडलेल्या अवस्थेत आढळून आला. ही बाब लक्षात येताच कुटुंबीयांनी तातडीने त्याला बाहेर काढून उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल केले.

मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती कृष्णाला मृत घोषित केले. अवघ्या तीन वर्षाच्या निष्पाप चिमुकल्याचा अशा दुर्दैवी घटनेत मृत्यू झाल्याने अहिरे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

घटनेची माहिती मिळताच नातेवाईक, ग्रामस्थ आणि परिसरातील नागरिकांनी रुग्णालयात धाव घेतली

या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात शोकमय वातावरण निर्माण झाले असून चिमुकल्या कृष्णाच्या अकाली निधनाबद्दल सर्व स्तरांतून दु:ख व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, घरांच्या परिसरात असलेल्या पाण्याच्या टाक्या, विहिरी व इतर धोकादायक ठिकाणे सुरक्षित ठेवण्याची गरज या घटनेमुळे पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. लहान मुलांवर सतत लक्ष ठेवणे तसेच अशा ठिकाणी आवश्यक सुरक्षेच्या उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे.

# जिल्ह्यातील शहराबरोबरच ग्रामीण भागाकडे प्राधान्याने लक्ष देऊन विकासाचे प्रश्न निश्चितपणे मार्गी लावू : पाटील

## आ. कराड यांच्या संवाद कार्यालयास महायुतीचे उमेदवार पाटील यांची सदिच्छा भेट

**लातूर/प्रतिनिधी :** भाजपाचा जिल्हाध्यक्ष झाला की आमदार होतो ही रमेशआप्पा पासून सुरु झालेली परंपरा यापुढेही कायम राहील यात शंका नाही जिल्ह्यातील रमेशआप्पा, संभाजीभैय्या आणि अभिमन्यू हे तिन्ही आमदार कार्यक्षमतेने काम करीत आहेत. त्यांच्या सोबत काम करण्याची पक्षाने उमेदवारी देऊन संधी दिली जिल्ह्यातील शहराबरोबरच ग्रामीण भागाकडे प्राधान्याने लक्ष देऊन विकासाचे प्रश्न निश्चितपणे मार्गी लावू अशी ग्वाही भाजपा महायुतीचे उमेदवार श्री. बसवराज पाटील मुरूमकर यांनी दिली.

धाराशिव, लातूर व बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातील भाजपा महायुतीचे उमेदवार तथा भाजपाचे जिल्हाध्यक्ष श्री. बसवराज पाटील मुरूमकर यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या संवाद या भाजपा कार्यालयास शुक्रवारी सायंकाळी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिल्हा बँकेचे माजी चेअरमन नाथसिंह देशमुख, प्रदेश ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, जेष्ठ पत्रकार प्रा. बीबी मोतीपवळे यांच्यासह इतर अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी आ. रमेशआप्पा कराड यांनी उमेदवार बसवराज पाटील यांचा लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाच्या वतीने यथोचित सत्कार करून त्यांचे स्वागत केले.

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून भाजपा महायुतीच्या वतीने लातूर जिल्ह्याला उमेदवारी मिळावी अशा प्रकारची मागणी रमेशआप्पा कराड यांच्यासह जिल्ह्यातील आमदार आणि नेते मंडळींनी केली होती असे सांगून यावेळी बोलताना उमेदवार बसवराज पाटील म्हणाले की, राज्यात लातूर जिल्हा आगळावेगळा जिल्हा असून या जिल्ह्याकडे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे विशेष लक्ष आहे. या जिल्ह्याकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. त्यांनी आणि चंद्रशेखर बावनकुळे साहेबांनी मोठा विश्वास ठेवून जिल्ह्यावर जबाबदारी टाकली असे बोलून उमेदवारी दिल्याबद्दल मनःपूर्वक आभार मानले.




जिल्ह्यातील रमेशआप्पा, संभाजीभैय्या आणि अभिमन्यू पवार हे तिन्ही आमदार कार्यक्षमतेने काम करीत आहेत. भविष्यात त्यांच्यासोबत काम करण्याची मला संधी मिळणार आहे रमेशआप्पांनी पक्षाचे संघटन वाढविण्याचे काम केले असून भविष्यात जिल्ह्यात आणखी चांगल्या पद्धतीने संघटन वाढवावे लागणार आहे असेही महायुतीचे उमेदवार तथा भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांनी बोलून दाखविले.

प्रारंभी आ. रमेशआप्पा कराड यांनी स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार म्हणून जाहीर झाल्यानंतर पहिल्यांदाच संवाद कार्यालयात आल्याबद्दल त्यांचे मनापासून स्वागत करून बसवराज पाटील यांचा विजय विक्रमी मताधिक्याने होणार असल्याचे बोलून दाखविले. आमच्यावर जी जबाबदारी द्याल ती आम्ही निश्चितपणे यशस्वी पार पाडू अशीही ग्वाही त्यांनी दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरज शिंदे यांनी केले. यावेळी भाजपाचे मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, उपसभापती शरद दरेकर, पद्माकर चिंचोलकर, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, सतीश आंबेकर, पांडुरंग बालवाड, दीपक वांगसकर, विजय चव्हाण, राजू अत्तार, दत्ता सरवदे, शेख अजीम, महेश गाडे, शेख मोहसीन, राजेंद्र काळे, सुकेश भंडारे, रुपेश काळे, सिद्धेश्वर मामडगे, विनायक मगर, शंकर चव्हाण, सोमनाथ वाघमारे, ज्ञानेश्वर जुगल, मारुती शिंदे, बालाजी राठोड, किशन क्षिरसागर, अजित पाटील, किरण मुंडे, धनंजय पवार, निवृत्ती चिद्रे, दिपक पवार, श्रीमंत नागरगोजे, संतोष चव्हाण, रविंद्र नागरगोजे, रमेश चव्हाण, दत्ता सप्ताळ, लक्ष्मण खलंग्रे यांच्यासह लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महानगरपालिकेतर्फे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सायकल रॅलीचे उत्साहात आयोजन





**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने आज शहरात एका भव्य सायकल रॅली चे आयोजन करण्यात आले होते. वाढते प्रदूषण रोखणे आणि पर्यावरण संवर्धनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक उपक्रमात लातूर सायक्लिस्ट ग्रुपच्या सदस्यांनी आणि महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने आणि उत्साहाने सहभाग नोंदवला.

रॅलीचा शुभारंभ लातूरचे महापौर जयश्रीताई सोनकांबळे आणि लातूर महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. मान्यवरांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात केली व स्वतःही या उपक्रमात सहभाग नोंदवून उपस्थितांचा उत्साह वाढवला.

सायकल रॅलीचा मार्ग

महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीपासून सुरू झालेली ही रॅली शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गस्थ झाली. रॅली लातूर शहर महानगरपालिका, महात्मा गांधी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, आर. जे. कॉम्प्लेक्स, औसा रोड येथून यू-टर्न घेउन पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौक, ५ नंबर चौक येथून यू-टर्न घेउन समारोप लातूर शहर महानगरपालिका कार्यालयात करण्यात आला.

पर्यावरण वाचवण्याचा आणि आरोग्याप्रति सजग राहण्याचा संदेश देणाऱ्या या रॅलीने संपूर्ण शहराचे लक्ष वेधून घेतले. लातूरकरांनीही या सायकल रॅलीचे स्वागत करत महानगरपालिकेच्या या स्तुत्य उपक्रमाचे मोठे कौतुक केले.

## देशातील अव्वल गायिका सायली टाकची दयानंद कला महाविद्यालयात एंट्री



**लातूर/प्रतिनिधी :** मराठवाड्यातील अग्रगण्य व प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था म्हणून ओळख असलेल्या दयानंद कला महाविद्यालयाने आणखी एका गुणी कलावंत विद्यार्थिनीचे स्वागत करून आपल्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेत नवा अध्याय जोडला आहे. राष्ट्रीय कला उत्सव स्पर्धेत देशात प्रथम क्रमांक पटकावणारी तसेच स्टार प्रवाह वाहिनीवरील लोकप्रिय ''मी होणार सुपरस्टार''या रिॲलिटी शोची विजेती कु. सायली टाक हिने दयानंद कला महाविद्यालयात बी.ए. प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतला आहे.

कु. सायली टाक हिचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या हस्ते तिच्या पालकांच्या उपस्थितीत औपचारिक स्वागत करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाने तिच्या कलाविकासासाठी आवश्यक सर्व शैक्षणिक व सांस्कृतिक सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त करत तिचे पालकत्व स्वीकारल्याची भावना व्यक्त केली.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शाह, उपाध्यक्ष रमेशकुमारजी राठी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनाखाली दयानंद कला महाविद्यालय हे संगीत, नाट्य, चित्रकला, कीर्तन आणि विविध कलाविषयांच्या दर्जेदार शिक्षणासाठी प्रसिद्ध आहे. महाविद्यालयात संगीतासाठी सुसज्ज वाद्यसंग्रह, नाट्यप्रशिक्षणासाठी रंगमंच तसेच विविध सांस्कृतिक उपक्रमांसाठी आवश्यक आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य दिशा, व्यासपीठ आणि प्रेरणा मिळते.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या युवक महोत्सवात मागील अनेक वर्षांपासून सर्वाधिक सर्वसाधारण विजेतेपद पटकावणारे दयानंद कला महाविद्यालय हे एकमेव महाविद्यालय ठरले आहे. कलावंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दयानंद शिक्षण संस्थेमार्फत लाखो रुपयांच्या शिष्यवृत्तीही दिल्या जातात. याचा लाभ घेत अनेक विद्यार्थी आज दूरदर्शन, चित्रपट आणि व्यावसायिक कलाक्षेत्रात यशस्वी कारकीर्द घडवत आहेत. आतापर्यंत या महाविद्यालयातील ३१ विद्यार्थी दूरदर्शन व चित्रपटसृष्टीत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्यात यशस्वी झाले आहेत.

सायली टाक हिने राष्ट्रीय कला उत्सव स्पर्धेत भारतात प्रथम क्रमांक मिळवून राज्याचे नाव उज्ज्वल केले आहे. तसेच प्रा. शशिकांत देशमुख व डॉ. वृशाली देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तिला सीसीआरटी शिष्यवृत्तीही प्राप्त झाली आहे.

यावेळी उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, संगीत विभाग प्रमुख व आयक्यूएसी प्रमुख डॉ. संतोष पाटील, डॉ. सुनील साळुंके, डॉ. प्रदीप सूर्यवंशी, प्रा. डॉ. संदीपान जगदाळे, प्रा. सुवर्णा लवंद, डॉ. दुर्गा शर्मा, कार्यालयीन अधीक्षक संजय व्यास तसेच सुनील टाक यांची प्रमुख उपस्थिती होती.

दयानंद कला महाविद्यालयाची समृद्ध सांस्कृतिक परंपरा विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, कला-संवेदना आणि सामाजिक बांधिलकी विकसित करत आहे. त्यामुळे हे महाविद्यालय नवोदित कलावंतांसाठी केवळ शिक्षणसंस्था नसून एक सृजनशील संस्कारकेंद्र म्हणून उदयास आले आहे.

(छायाचित्र ओळ) : राष्ट्रीय स्तरावरील गायिका कु. सायली टाक हिचे दयानंद कला महाविद्यालयात स्वागत करताना प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड व उपस्थित मान्यवर.

# लातूर जिल्ह्यात पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाच्या जुगार व मटका अड्डयांवर धाडी

**लातूर/प्रतिनिधी :** नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी लातूर जिल्हयात पोलीस पथकाची रवानगी केली होती.

सदर पथकाने, दिनांक ०५/०६/२०२६ रोजी, लातूर जिल्ह्यातील निलंगा शहरातील शिवाजी चौक परिसरात चालू असलेल्या दोन मटका बुकींवर कारवाई करत, २४,३२०/- रुपयांची रोकड, ४३ हजार रुपयांचे (६) मोबाईल व ४८,६००/- रुपयांचे संगणक साहित्य असा एकूण १,१५,९२०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एकूण (६) आरोपीतांना ताब्यात घेवून, त्यांचेविरुध्द निलंगा पोलीस ठाणे येथे गुरनं २३२/२०२६ व २३३/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदयाअन्वये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.





तद्नंतर, मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, शिरुर अनंतपाळ येथे हॉटेल युवराज बारचे समोरील नटू लंच होम येथे छापा टाकला असता, सदर ठिकाणी तिर्रट नावाचा जुगार खेळताना (९) इसम मिळून आले. सदर इसमांना ताब्यात घेऊन, त्यांच्याकडून २८,३००/- रुपयांची रोकड, ६१,०००/- रुपयांचे (८) मोबाईल, व ३,००,०००/- रुपयांच्या (६) मोटारसायकली असा एकूण ३,८९,३००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यांचेविरुध्द शिरुर अनंतपाळ पोलीस ठाणे येथे गुरनं १०२/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्याअन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

उपरोक्त तिनही कारवायांत, पोलीस पथकाने एकूण ५,०५,२२०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपीतांविरुद्ध वरीलप्रमाणे गुन्हे नोंद केले आहेत. खबर हेल्पलाइन वरून माहिती द्या: अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना पोहोचविता

यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली खबर नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेज द्वारे पाठवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.